मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९३ वा ● सोमवार, ता. १२ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा यांचे निधन



**पुणे । रयत समाचार**

ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा (वय ८७) यांचे रविवारी (११ जानेवारी) दुपारी पुण्यातील खासगी रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात कन्या ॲड. आरती सोनग्रा (घुले) असा परिवार आहे. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सोमवारी सकाळी ९ ते साडे वाजेपर्यंत पुण्यातील विमाननगर येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी साडे वाजता येरवडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या कन्या आरती यांनी दिली. रतनलाल सोनग्रा यांचा अहिल्यानगर शहराशी जिव्हाळ्याचा आणि जुना संबंध होता. कर्मभूमी पुणे असली, तरी त्यांच्या जीवनाची जडणघडण व वैचारिक वाटचाल नगरमध्येच घडली. त्यांनी अहमदनगर महाविद्यालयात शिक्षण घेतले असून, तेथूनच त्यांच्या साहित्यिक प्रवासाची पायाभरणी झाली. राजकीयदृष्ट्या सुरुवातीच्या काळात ते काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते होते. नगरचे दिग्गज नेते व माजी आमदार स्वर्गीय नवनीतभाई बार्शीकर यांचे ते एकेकाळी प्रखर विरोधक होते. मात्र पुढे बार्शीकरांच्या विकासकामांचे त्यांनी जाहीरपणे कौतुकही केले होते. मूळ राजस्थानातील (मारवाड प्रांत) असले तरी सोनग्रा यांचे कुटुंब पिढ्यानपिढ्या महाराष्ट्रात, विशेषतः पुणे व अहिल्यानगर भागात स्थायिक झाले. त्यामुळे ते विचाराने, संस्काराने आणि लेखनातून पूर्णतः महाराष्ट्रीय झाले होते. साहित्यातून शोषित, वंचित समाजाचे दुःख, संघर्ष आणि व्यवस्थेविरुद्धचा आक्रोश त्यांनी प्रभावीपणे मांडला. 'तडा' ही त्यांची गाजलेली कादंबरी दलित जीवनातील संघर्षांचे वास्तव मांडते. 'झोंब' ग्रामीण जीवनातील संघर्ष उलगडते, तर 'आक्रोश' अन्यायाविरुद्धचा बुलंद आवाज ठरली. 'कबीरवाणी' हे त्यांचे पुस्तकही विशेष चर्चेत राहिले. कादंबरी, कथांसह कवितेतूनही त्यांनी समता, न्याय आणि मानवतावादी मूल्यांचा आग्रह धरला. रतनलाल सोनग्रा यांच्या निधनाने संवेदनशील, लढाऊ आणि समाजाभिमुख साहित्यिक काळाच्या पडद्याआड गेला असून, त्यांच्या शब्दांतून उभा राहिलेला संघर्षाचा वारसा मराठी साहित्याला कायम प्रेरणा देत राहील.



## महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर आ. हेमंत ओगले

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या कार्यकारी परिषदेवर श्रीरामपूरराहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निर्देशानुसार ही नियुक्ती करण्यात असून, त्याबाबतचे पत्र अप्पर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. शेती विषयात महाराष्ट्रासह देशपातळीवर अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर काम करण्याची संधी आमदार ओगले यांना मिळाली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर त्यांनी शेतकरी, शेतमजूर यांसारख्या तळागाळातील घटकांसाठी विधानसभेत प्रभावीपणे आवाज उठवला तसेच मतदारसंघातील अनेक महत्त्वाचे विषय मुद्देसूदपणे मांडले. या कामगिरीची दखल घेऊन महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही निवड केली आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाची समृद्ध परंपरा असून, शेती व पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक बदल घडवून शेतकरी वर्गाला लाभ कसा मिळेल यासाठी येथे सातत्याने नवनवीन प्रयोग केले जातात. आमदार ओगले यांच्या निवडीमुळे मतदारसंघाला निश्चितच लाभ होणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून श्रीरामपूर नगर परिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, मार्केट कमिटी सभापती सुधीर नवले, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, गटनेते मुजफ्फर शेख यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक व काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## स्वामी समर्थ पालखी-पादुका परिक्रमेचा बेळगावात मुक्काम




**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट न्यासाच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या पालखी व पादुकांच्या परिक्रमेचे आयोजन करण्यात येत असून यंदा या परिक्रमेचे २१ वे वर्ष आहे. महाराष्ट्रात परिभ्रमण करीत असलेली ही पालखीपादुका परिक्रमा बेळगाव शहरात विविध ठिकाणी १९ ते २६ जानेवारीदरम्यान मुक्कामी राहणार आहे. श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाची आस असूनही अनेक स्वामीभक्त, अबालवृद्ध व महिलांना अक्कलकोट येथे दर्शनासाठी जाता येत नाही. अशा भक्तांना दर्शन व सेवासंधी मिळावी, या उद्देशाने श्री स्वामी समर्थ त्यांच्या गावी येत असल्याची भावना भक्तांमध्ये आहे. अक्कलकोट येथून १६ नोव्हेंबर रोजी या परिक्रमेचे प्रस्थान झाले असून महाराष्ट्रातील विविध शहरे व गावांना भेट देत २० जानेवारी रोजी परिक्रमेचे बेळगावात आगमन होणार आहे. २६ जानेवारीपर्यंत परिक्रमेचा मुक्काम बेळगाव शहरात राहणार आहे. बेळगाव शहर व परिसरातील स्वामीभक्त परिक्रमेची आतुरतेने वाट पाहत आहेत. यावर्षीच्या बेळगाव मुक्कामादरम्यान कलर्स टीव्ही वाहिनीवरील 'स्वामी समर्थ' मालिकेत स्वामी समर्थांची भूमिका साकारणारे अभिनेते अक्षय मुडवाडकर तसेच स्वामीभक्त चोळप्पा महाराजांची भूमिका साकारणारे नचिकेत जोग हेही बेळगावात उपस्थित राहणार आहेत.

# 'ग्रोक' एआयद्वारे अश्लील चित्रे तयार करण्यावर बंदी

### केंद्र सरकारच्या इशाऱ्यानंतर 'X' कडून ६०० हून अधिक खाती बंद

**नवी दिल्ली । रयत समाचार**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा गैरवापर करून महिलांची अश्लील चित्रे तयार केल्याच्या 'ग्रोक' (Grok) चॅटबॉट प्रकरणी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X ने आपली चूक मान्य केली आहे. केंद्र सरकारच्या कडक इशाऱ्यानंतर ' X' ने अशा प्रकारचा मजकूर रोखण्यासाठी ठोस पावले उचलत आतापर्यंत ३,५०० हून अधिक आक्षेपार्ह पोस्ट हटवल्या असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६०० हून अधिक युजर्सची खाती कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहेत.




शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी २ जानेवारी रोजी केंद्रीय आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले होते. काही विकृत युजर्स महिलांच्या फोटोंचा वापर करून Grok च्या माध्यमातून आक्षेपार्ह व अश्लील चित्रे तयार करत असल्याचे त्यांनी पुराव्यासह नमूद केले होते. याची दखल घेत केंद्र सरकारने त्याच दिवशी ' X' ला तातडीने असा मजकूर हटवण्याचे निर्देश देत, अन्यथा कायदेशीर कारवाईचा इशारा दिला होता. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सर्व सोशल मीडिया कंपन्यांना अश्लील व बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मजकुराबाबत आयटी कायद्याचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या कारवाईनंतर ' X' ने भूमिका स्पष्ट करत भारत ही त्यांच्यासाठी मोठी बाजारपेठ असल्याचे सांगत येथील कायदे व नियमांचे पूर्ण पालन केले जाईल, असे म्हटले आहे. सुरुवातीला कंपनीचे मालक एलन मस्क यांनी तंत्रज्ञानाचा बचाव केला होता; मात्र दबावानंतर कंटेंट मॉडरेशन अधिक कडक करण्याचे कंपनीने मान्य केले आहे. दरम्यान, खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी ' X' च्या कारवाईवर पुन्हा प्रश्न उपस्थित केला आहे. आक्षेपार्ह चित्रे तयार करणे पूर्णपणे थांबवण्याऐवजी ही सुविधा केवळ 'पेड युजर्स'पुरती मर्यादित केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. महिला व मुलांच्या सुरक्षेसाठी हे अपुरे असून, अशा निंदनीय वर्तनाचे मॉनेटायझेशन होत असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. केंद्र सरकारच्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार, गैरप्रकारांना आळा न घातल्यास कंपन्यांना गंभीर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागणार आहे.

## आश्वासनं नकोत, लेखी हमी द्या

### मतदारांची 'स्टॅम्प पेपर' मोहीम

**नवी मुंबई । रयत समाचार**

निवडणुका आल्या की आश्वासनांचा पाऊस आणि मतदानानंतर विस्मरण, या चक्राला पूर्णविराम देण्यासाठी नवी मुंबई येथे मतदारांनी एक वेगळीच जनजागृती मोहीम सुरू केली आहे. "खोट्या शब्दांना पूर्णविराम लेखी हमीच पुरावा!" या भूमिकेतून मतदार उमेदवारांकडून थेट १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर विकासकामांची लेखी हमी मागत आहेत. शहरात ठिकठिकाणी या आशयाचे बॅनर झळकत असून या मागणीची जोरदार चर्चा सुरू आहे. सजग नागरिक मंचच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या मोहिमेत "नो स्टॅम्प पेपर = नो व्होट" अशी ठाम भूमिका घेण्यात आली आहे. केवळ तोंडी आश्वासनांवर विश्वास न ठेवता उमेदवारांनी निवडून आल्यावर काय करणार, याचा लेखी पुरावा (ॲफिडेव्हिट) द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे 'स्मार्ट नवी मुंबई'ची ओळख अधिक ठळक होत असून राज्यातील मतदारांसमोर 'स्मार्ट मागण्या' कशा असाव्यात, याचा वस्तुपाठ दिला जात आहे. मोहिमेअंतर्गत मतदारांनी उमेदवारांसमोर सहा प्रमुख अटी ठेवल्या आहेत. स्थानिक गरजांना प्राधान्य, नगरसेवक निधीचा पारदर्शक हिशोब, जनता दरबारातून उत्तरदायित्व,




भ्रष्टाचारास बंदी, दर्जेदार पायाभूत सुविधांची हमी तसेच आरोग्य व शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य. "बदल कागदावर नव्हे, तर कृतीत हवा," असा संदेश या माध्यमातून दिला जात आहे. या 'हटके' बॅनरबाजीमुळे सोशल मीडियावरही मोठा प्रतिसाद मिळत असून अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी पाठिंबा दर्शविला आहे. प्रचाराला येण्यापूर्वीच उमेदवारांना आता 'स्टॅम्प पेपर'च्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. "आहे का तयारी तुमची?" हा प्रश्न प्रत्येक मतदाराच्या मुखात आहे. सजग नागरिक मंचचे प्रवर्तक सुधीर लक्ष्मीकांत दाणी म्हणाले, "लोकशाही म्हणजे केवळ पाच वर्षांतून एकदा बटण दाबणे नव्हे; लोकप्रतिनिधीला पाच वर्षे कर्तव्याच्या चौकटीत बांधून ठेवणे होय. शब्द हवेत विरतात, कागदावरची शाई भविष्य सुरक्षित करते. ज्यांना आपल्या कामाची खात्री आहे त्यांनी स्टॅम्प पेपरवर यावे; अन्यथा मतदारांच्या उंबरठ्यापर्यंत येऊ नये." या मोहिमेमुळे नवी मुंबईत लोकशाहीचा नवा अध्याय सुरू झाल्याची भावना व्यक्त होत असून मतदार आता प्रेक्षक न राहता उत्तरदायित्व ठरवणारे सजग नागरिक बनत असल्याचे चित्र दिसत आहे.

## जिल्ह्याच्या गरजांसाठी सीएसआर निधीचे लक्ष्यित नियोजन आवश्यक- डॉ. पंकज आशिया

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

सीएसआर ही समाजाभिमुख विकासासाठीची प्रभावी साधनयोजना आहे. जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक व मानवी विकास निर्देशांक उंचावण्यासाठी उद्योग व सीएसआर संस्थांनी जिल्हा प्रशासनाच्या गरजेनुसार व प्राधान्यक्रमानुसार निधीचे लक्ष्यित नियोजन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्ह्यातील विविध विकासात्मक गरजांसाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीचा नियोजनबद्ध, समन्वयित व परिणामकारक वापर व्हावा, या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सीएसआर कनेक्ट कॉनक्लेव २०२६ परिषदेत डॉ. आशिया बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी तथा परिषदेचे सदस्य सचिव दीपक दातीर, रमेश कासार, रोटरीचे डॉ. विनोद मोरे, क्षितिज झावरे, मर्लिन इलिशा, एव्हँजेलिन एलिशा, महेश गोपाळकृष्णन, तुषार देशमुख, सारिका मोरे, सुजाता उबाळे, हिरा मोतीयानी आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, जिल्ह्याच्या विकासासाठी शासन तसेच प्रशासनाच्या माध्यमातून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत असले तरी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये उद्योग व सीएसआर संस्थांची साथ अत्यंत मोलाची आहे. जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जलस्रोत पुनरुज्जीवन, प्लास्टिकमुक्त अभियान, नवीकरणीय ऊर्जेचा वापर, घनकचरा व्यवस्थापन, कृषी, पशुसंवर्धन, क्रीडा या बाबींमध्ये सीएसआरच्या माध्यमातून उपक्रम राबविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील दुर्बल घटक, बालक व महिलांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर संस्थांनी पुढाकार घ्यावा. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासन, उद्योग, सीएसआर संस्था व स्वयंसेवी संघटना यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. प्रत्येक सीएसआर प्रकल्प हा जिल्ह्याच्या विकास आराखड्याशी सुसंगत असावा, निधीची परिणामकारकता व मोजता येण्याजोगे निष्कर्ष देणारा आराखडा असावा, अशी अपेक्षा व्यक्त करत सीएसआरच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांसाठी संस्थांना आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या एक खिडकी योजनेतून देण्याबरोबरच आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३ हजार ५३२ पेक्षा अधिक शाळा असून ५ हजार ३०० अंगणवाड्यांतून सर्वसामान्यांच्या पाल्यांना शिक्षण देण्यात येते. शाळांमधून शिक्षणाचा दर्जा उंचावणे, शालेय पायाभूत सुविधा बळकट करणे, डिजिटल शिक्षण व्यवस्था निर्माण करणे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व कौशल्याधारित प्रशिक्षण उपलब्ध करून देणे या क्षेत्रांमध्ये सीएसआरचा उपयोग होणे अत्यावश्यक आहे.

# भारत हा संस्कृतीप्रधान देश असून गोव्यातून त्याची ओळख जगाला मिळत आहे- मंत्री दिगंबर कामत

**काणकोण । प्रभाकर ढगे**

आदर्श युवा संघ, श्री बलराम शिक्षण संस्था तसेच कला व संस्कृती संचालनालय व आदिवासी संशोधन संस्था, गोवा सरकार आणि जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रौप्यमहोत्सवी 'आदी लोकोत्सव२५' चे भव्य उद्घाटन आदर्शग्राम आमोणेपैंगीण येथे उत्साहात पार पडले. उद्घाटनप्रसंगी गोवा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री दिगंबर कामत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री दिगंबर कामत म्हणाले की, भारत हा संस्कृतीप्रधान देश आहे.

विविधतेत एकता हीच आपली खरी ओळख असून, त्या संस्कृतीची समृद्ध परंपरा गोव्यातून देशाला आणि जगाला दाखविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मंत्री डॉ. रमेश तवडकर करीत आहेत. गोव्यातील ग्रामीण व आदिवासी संस्कृती जपण्याचे आणि ती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम आदी लोकोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. भगवान बिरसा मुंडा यांची खरी ओळख गोव्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे श्रेयही डॉ. रमेश तवडकर यांनाच जाते. विकसित काणकोणसाठी त्यांच्या नेतृत्वाला पर्याय नाही, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. कार्यक्रमाला आयोजन समितीचे अध्यक्ष तसेच कला व संस्कृती खात्याचे मंत्री डॉ. रमेश तवडकर हे विशेष उपस्थित होते. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी सांगितले की, गोव्यातील ग्रामीण आणि आदिवासी संस्कृतीची ओळख केवळ राज्यापुरती मर्यादित न राहता ती देशासह जगभर पोहोचली पाहिजे. आदी लोकोत्सव हा केवळ



उत्सव नसून आदिवासी समाजाच्या परंपरा, कला, संस्कृती आणि जीवनपद्धती जपणारा एक व्यापक सामाजिक उपक्रम आहे. या माध्यमातून गोव्याची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट होत आहे, असे ते म्हणाले. या उद्घाटन सोहळ्याला माजी केंद्रीय मंत्री भारती पवार, तेलंगणा राज्याचे एस.टी. मोर्चा नेते नेवनाथ रवी नायक, आंध्रप्रदेश एस.टी. मोर्चाचे सरचिटणीस हरी नायक, छत्तीसगढ एस.टी. प्रदेश मंत्री विद्या सदर, दिल्ली एस.टी. मोर्चाचे अध्यक्ष सी. एल. मीना, बंगाल एस.टी. मोर्चाचे अध्यक्ष मेघा सुरेंद्रु आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच राजस्थान येथील एस.टी. मोर्चा प्रदेशाध्यक्ष व जहाजपूरकोठडी मतदारसंघाचे आमदार गोपीचंद मीणा, पैंगीण जिल्हा पंचायत सदस्य अजय लोलयेंकर, पैंगीण पंचायत सरपंच सविता तवडकर, काणकोण नगरपालिकेचे नगराध्यक्ष लक्ष्मण पागी, आगोंद पंचायतीचे सरपंच निलेश पागी, लोलये पंचायतीच्या सरपंच निशा च्यारी, श्रीस्थळ पंचायत सरपंच सेजल गावकर, आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, खोतिगांव पंचायत सरपंच जयेश गावकर, काणकोण भाजप मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त जनजागृती आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये भारती पवार, ओ. एस. नारायण शंकर, पी. एस. माया, मनी टी. एन., विकास नाईक, सदानंद गावणेकर, चंद्रास के. देसाई, सिद्धार्थ गांवस देसाई, सालुंके, नारायण नेवकर यांचा समावेश होता. एस.टी. मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष समीर ऊरांव यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आदी लोकोत्सव२५ निमित्त भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीचा भव्य सोहळा साजरा होत आहे. मंत्री डॉ. रमेश तवडकर यांचे कार्य देशभरातील नेत्यांना परिचित असून, देश सशक्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या नेतृत्वाची झलक त्यांच्या कार्यातून दिसते. भाजपच्या नेतृत्वाने आदिवासी समाजाला न्याय देण्याचा सातत्यपूर्ण आणि यशस्वी प्रयत्न केला आहे. डॉ. रमेश तवडकर हे तळागाळातील कष्टकरी समाजाचे खरे नेतृत्व आहेत, असे त्यांनी नमूद केले. माजी केंद्रीय मंत्री भारती पवार यांनी बोलताना आदर्श युवा संघाच्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. भारताची खरी ओळख ही गावांमध्ये आहे. भाषा समाजाला जोडते. महिलांनी सादर केलेले परंपरागत खाद्यसंस्कृतीचे दर्शन अत्यंत स्तुत्य आहे. श्रमधामच्या माध्यमातून मंत्री तवडकर यांनी केलेल्या कार्याची पोचपावती लोकांच्या आशीर्वादातून निश्चितच मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

क्रीडा खात्याचे कार्यकारी संचालक डॉ. अजय गावडे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, युवक सक्षमीकरण हेच देशाच्या प्रगतीचे खरे बळ आहे. क्रीडा, शिक्षण आणि संस्कृती यांच्या माध्यमातून युवकांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचार निर्माण होतो. अशा लोकोत्सवांमुळे युवकांना आपल्या मुळांशी जोडले जाण्याची संधी मिळते आणि हेच भविष्यात सक्षम राष्ट्र घडविण्यासाठी महत्त्वाचे आहे. उपकुलसचिव मधुकिशन यांनी आपल्या मनोगतात स्वातंत्र्य भारताची किंमत आपण सर्वांनी जपली पाहिजे, असे सांगितले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गावकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. स्वागत भाषण मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन चंद्रकांत वेळीप यांनी केले. आदिवासी संस्कृती, कला आणि परंपरेचा जागर करणारा आदी लोकोत्सव२५ हा उत्सव उपस्थितांच्या दृष्टीने संस्मरणीय ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५–२६



## प्रेम, सद्भावना व एकतेनेच देश चालतो–खासदार इम्रान प्रतापगढी



**अहमदनगर । आबीद खान**

देश प्रेम, सद्भावना व एकतेच्या बळावर उभा आहे. मात्र सध्याचे सत्ताधारी द्वेष, नफरत आणि समाजात फूट पाडणारी भाषा वापरून लोकांना विभागण्याचे काम करत आहेत. राजकारणाच्या स्टेजवरून धर्माच्या गोष्टी किंवा घोषणा दिल्या जाऊ नयेत, असे ठाम मत काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार इम्रान प्रतापगढी यांनी व्यक्त केले. ते मुकुंदनगर येथील सीआयव्ही मैदानावर काँग्रेस व महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलत होते. खासदार प्रतापगढी म्हणाले की, ही निवडणूक शहराच्या विकासाची व स्थानिक प्रश्नांची आहे; मात्र काही पक्ष राष्ट्रीय मुद्दे पुढे करून जनतेची दिशाभूल करत आहेत. शहरातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण व रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांपासून लक्ष हटवणे दुर्दैवी आहे. ते पुढे म्हणाले, नगर शहराच्या विकासासाठी स्थानिक आमदार किंवा सत्ताधाऱ्यांकडून निधी न मिळाल्यास मी माझ्या खासदार निधीतून विकासकामांसाठी मदत करीन; तसेच इतर खासदारांचे निधीही नगर शहरासाठी मिळवून देण्याची ग्वाही दिली. मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी एमआयएममुळे समाजाचे नुकसान होत आहे. समाजाचे हितचिंतक असल्याचे भासवून मजबूत नेतृत्वाची ताकद कमी केली जाते, परिणामी समाजाच्या प्रगतीला फटका बसतो. पतंग जरी पक्षाचा असला तरी त्याचा मांजा सत्ताधाऱ्यांचा आहे, हे समाजाने समजून घ्यावे, असेही ते म्हणाले. काँग्रेस पक्षाबाबत ते म्हणाले की, हा पक्ष सर्व समाजांचा आहे दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याक, शेतकरी, कामगार, व्यापारी व युवक–युवती यांना न्याय देणारा पक्ष म्हणजे काँग्रेस. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस व महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी मुकुंदनगरमधील उमेदवार शेख नसीम खान, शेख फैयाज अजीजोद्दीन, खान मिनाज जफर, शम्स हाजी समीर खान यांच्या विजयासाठी नागरिकांनी एकजूट होण्याचे आवाहन करण्यात आले. या सभेस काँग्रेसचे दीप चव्हाण, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी महापौर अभिषेक कळमकर, सय्यद खलील, फिरोज खान, निसार बागवान, माजी नगरसेवक संजय झिंजे, शिवसेना (उबाठा)चे किरण काळे, मनोज गुंदेचा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे अतहर खान यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. या जाहीर सभेत हजारोंच्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती दर्शविली.



महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गांधी मैदान येथे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या जाहीर सभेत उपस्थित पदाधिकारी, उमेदवार व कार्यकर्ते. (छाया : वाजिद शेख नगर)

# महाविकास आघाडीचा ‘निश्चयनामा २०२६’ जाहीर

## लाडक्या बहिणींना स्थावर मालमत्तेवर ५० टक्के सवलत

**अहमदनगर । रयत समाचार**

नगरकरांना छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वसमावेशक हिंदुत्व मान्य आहे. अठरापगड जातींना सोबत घेऊन स्वराज्य उभारणारे हिंदुत्वच आपले आहे; जातीभेद करणारे हिंदुत्व अमान्य आहे. राजकारण सहनशीलतेने करत आहोत; मात्र दादागिरी–धमकी–दहशत केली तर गाठ माझ्याशीच आहे, असा इशारा निलेश लंके यांनी दिला. प्रोफेसर कॉलनी चौकात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या सर्व प्रभागांतील उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. याच सभेत महाविकास आघाडीचा ‘निश्चयनामा २०२६’ जाहीर करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख किरण काळे, प्रा. शशिकांत



गाडे, काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, निलेश मालपाणी, प्रा. सिताराम काकडे, नामदेव पवार, गोविंद मोकाटे, संजय झिंजे, आरिफ शेख, मनोज गुंदेचा, गिरीश जाधव, अभिजीत ससाणे, बाळासाहेब भंडारी, फारुक रंगरेज आदींसह तिन्ही पक्षांचे पदाधिकारी व उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार लंके म्हणाले की, आघाडी सहनशीलतेने राजकारण करत आहे; पण दडपशाही, खोटे गुन्हे, व्यवसायांवर कारवाई व वैयक्तिक त्रास सहन केला जाणार नाही. ‘‘हात जोडताही येतात आणि वेळप्रसंगी भायापणही करता येते,’’ असे सांगत त्यांनी कार्यकर्ते व उमेदवारांवर गुंडगिरी सहन न करण्याचा इशारा दिला. ‘निश्चयनामा २०२६’मध्ये शहरातील लाडक्या बहिणींच्या नावावरील स्थावर मालमत्तेवर ५० टक्के सवलतीची घोषणा करण्यात आली. निवडून आलेले नगरसेवक नागरिकांना सन्मानाने वागवतील व कामे करतील; चूक झाल्यास जाबही देतील, असे त्यांनी स्पष्ट केले. सिस्पे पे घोटाळ्याबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, गोरगरिबांचे पैसे अडकले आहेत. आठ महिन्यांपूर्वीच चौकशीची मागणी करण्यात आली होती; निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधाऱ्यांना जाग आली. उद्घाटनाला उपस्थित राहिलो म्हणून घोटाळ्याची जबाबदारी आमच्यावर ढकलणे चुकीचे आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. फेज–२ योजना १६ वर्षांनंतरही पूर्ण कार्यान्वित नसताना विकासाच्या गप्पा सुरू असल्याची टीका करत त्यांनी सांगितले की, दहशतीने काही काळ राज्य करता येईल; पण लोकांच्या हृदयावर राज्य महाविकास आघाडीच करेल. शहरात भाजपची ‘बी–टीम’ म्हणून ओळखली जाणारी एमआयएम आणण्याचे काम सत्ताधाऱ्यांनीच केल्याचा आरोपही त्यांनी केला. सभेच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. फटाक्यांच्या आतषबाजीत घोषणाबाजी झाली. नागरिक व महिलांची मोठी उपस्थिती होती; व्हिडिओद्वारे ‘निश्चयनामा २०२६’ सादर करण्यात आला. काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी शहराच्या विकासातील अपयशावर टीका केली; मोकाट कुत्रे, नाट्य संकुल व कचरा डेपोचे प्रश्न उपस्थित केले. शिवसेना शहरप्रमुख किरण काळे यांनी रस्त्यांच्या दुरवस्थेवर सवाल करत भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी केली. राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी वाढती गुन्हेगारी व दहशतीवर बोट ठेवले. अभिजीत ससाणे यांनी सांगितले की, गोरगरिबांचे खरे प्रतिनिधित्व खासदार निलेश लंके करतात; जनता योग्य उत्तर देईल.

# लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक– आबीद खान

## मखदूम सोसायटीकडून मतदान जनजागृतीपर विविध स्पर्धांचे आयोजन



**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ च्या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व जिल्हा परिषद उर्दू शाळा, फकीरवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘‘आपले शहर आपले मतदान’’ या मतदार जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती विषयावर आधारित भेटकार्ड बनवा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदानाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. विद्यार्थ्यांनी ‘‘१०० टक्के मतदान’’ करण्याचे आवाहन करत पालक, नातेवाईक व परिसरातील नागरिकांना मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमावेळी मखदूम एज्युकेशन अँड वेल्फअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, मुख्याध्यापिका शेख अंजुम, दिलशाद शेख, सुम्मैया पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आबीद दुलेखान म्हणाले की, मतदान हा केवळ अधिकार नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. देशाचे भविष्य घडवण्याची ताकद एका मतामध्ये दडलेली आहे. ‘‘आपले शहर आपले मतदान’’ या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह प्रेरणादायी असून लहान वयातच लोकशाही मूल्यांची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा व जनजागृती रॅलीच्या माध्यमातून १०० टक्के मतदानाचे आवाहन करणे ही अभिमानाची बाब आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाने कोणत्याही भीती, प्रलोभन व भेदभावाविना मतदान करून लोकशाही मजबूत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# डॉ. विखे महाविद्यालयात संवेदनशीलता व जनजागृतीवर व्याख्यान



**अहमदनगर । विजय मते**

विळद घाट परिसरातील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संवेदनशीलता व जनजागृती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा सत्र न्यायालयाचे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. तनुजसिंह युवराजसिंग ठाकूर यांनी प्रतिबंधक कायद्यातील विविध तरतुदी, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची गरज तसेच अंतर्गत तक्रार समितीची रचना, कार्यपद्धती व तक्रार निवारण प्रक्रियेबाबत अभ्यासपूर्ण व प्रभावी मार्गदर्शन केले. महिला कर्मचारी व विद्यार्थिनींनी कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी संबंधितांशी वागताना कोणत्या गोष्टी स्वीकाराव्यात व कोणत्या गोष्टींना प्रतिकार करावा, याबाबत सुज्ञपणे निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. हा मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी रस्त्यावरील सिग्नलचे उदाहरण देऊन समजावून सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना झाला. कार्यक्रमासाठी तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापूरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. नवथर यांनी कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत कायद्याबाबत जागरूकता निर्माण होणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. डॉ. एस. एस. मगर यांनी प्रास्ताविक केले. प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. ए. मरकड, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. विवेक पाटेकर यांनी आभार मानले. अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे महाविद्यालयीन परिसरात सुरक्षित, सन्मानजनक व संवेदनशील वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. फाउंडेशनचे सचिव डॉ. पी. एम. गायकवाड यांनी आयोजकांचे अभिनंदन करून कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर–सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज–नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
– संपर्क –
९०११११९३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# पत्रकारांनी अभिमानापेक्षा स्वाभिमान जपला पाहिजे- प्राचार्य डॉ.दुकळे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त व पत्रकार दिनाचे औचित्य साधून निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव यांच्या वतीने भव्य पत्रकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास शेवगाव तालुक्यातील विविध माध्यमांतील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील मोलाच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

समाजप्रबोधन, सत्याची कास आणि निर्भीड लेखणी ही त्यांनी घालून दिलेली परंपरा आजच्या पत्रकारांनी अधिक बळकटपणे पुढे नेली पाहिजे, असे मत बुधवंत कैलास यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. ज्येष्ठ पत्रकार आर. आर. माने यांनी पत्रकारितेच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीवर प्रकाश टाकत पत्रकारांना येणाऱ्या आव्हानांबाबत सखोल मार्गदर्शन केले. बातमी संकलन, सत्य पडताळणी आणि सामाजिक भान या बाबी पत्रकारितेचा आत्मा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. पी. ए. दुकळे यांनी पत्रकारितेच्या सामाजिक भूमिकेवर सखोल भाष्य केले. पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची प्रक्रिया नसून समाजाला न्याय देणारी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी व लोकशाहीचा कणा मजबूत करणारी शक्ती आहे. पत्रकारांनी अभिमानापेक्षा स्वाभिमान जपला पाहिजे.

सत्य, नीतिमत्ता व निर्भीडता या मूल्यांवर आधारित पत्रकारिताच समाजाचा खरा आरसा ठरते, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच शोषित, वंचित व दुर्बल घटकांचा आवाज बुलंद करण्याची जबाबदारी पत्रकारांनी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अमोल खोसे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. निकिता बोरुडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. आनंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, विद्यार्थी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार दिनानिमित्त आयोजित हा सन्मान सोहळा प्रेरणादायी ठरला.

# विज्ञानाच्या प्रयोगांतून यशाचा नवा अध्याय

## जिल्हास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात प्रवीण शिंदे प्रथम

**अहमदनगर । रयत समाचार**

''प्रयोगशाळा ही केवळ चार भिंतींत मर्यादित नसून ती शिक्षकाच्या विचारांत आणि विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेत असते,'' हे पुन्हा एकदा सिद्ध करत जि. प. प्राथमिक शाळा, थोरला मळा, केंद्र करंजी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील श्री. प्रवीणजी शिंदे सर यांनी अहिल्यानगर जिल्हास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकावून शिक्षणक्षेत्रात प्रेरणादायी इतिहास घडवला आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक विज्ञानाची गोडी लागावी, त्यांच्यात तर्कशुद्ध विचार, संशोधन वृत्ती आणि प्रयोगशीलता निर्माण व्हावी या ध्येयाने प्रवीणजी शिंदे सर अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या वर्षीच्या प्रकल्पात विज्ञानातील मूलभूत संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे सहज, सोप्या आणि परिणामकारक पद्धतीने मांडण्यात आल्या होत्या. नाविन्यपूर्ण मांडणी, शैक्षणिक उपयुक्तता आणि वास्तव जीवनाशी असलेली सांगड यामुळे परीक्षक व उपस्थितांचे विशेष लक्ष या प्रकल्पाकडे वेधले गेले. विज्ञानाचे गाढे अभ्यासक, तर्कशुद्ध विचारांचे धनी आणि प्रयोगशीलतेचे चालतेबोलते विद्यापीठ म्हणून ओळखले जाणारे प्रवीणजी शिंदे सर यांनी आपल्या अथक परिश्रमांमुळे हे यश संपादन केले आहे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही कल्पकतेच्या बळावर विद्यार्थ्यांच्या हातात प्रयोगशाळा देण्याचे काम त्यांनी केले आहे. ''विद्यार्थ्याने प्रश्न विचारायला शिकले की तो वैज्ञानिक घडू लागतो,'' हा त्यांचा विचार त्यांच्या प्रत्येक उपक्रमातून दिसून येतो. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पाठांतरावर आधारित शिक्षण न देता अनुभवाधिष्ठित व कृतीप्रधान शिक्षण देण्यावर प्रवीणजी शिंदे सरांचा विशेष भर आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडणारे विद्यार्थी विज्ञानाकडे केवळ विषय म्हणून नव्हे, तर जीवन समजून घेण्याचे प्रभावी साधन म्हणून पाहू लागले आहेत. हेच त्यांच्या अध्यापनाचे खरे यश मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाची दखल घेत अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार श्री. राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या शुभहस्ते प्रवीणजी शिंदे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी प्रवीणजी शिंदे सर यांच्या कार्याचे कौतुक करत, ''अशा प्रयोगशील व संशोधनशील शिक्षकांमुळेच ग्रामीण भागातील शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण आणि काळानुरूप होत आहे,'' असे गौरवोद्गार काढले. तसेच या अभिमानास्पद यशाबद्दल केंद्रप्रमुख गोरे साहेब, विस्ताराधिकारी रामनाथ कराड साहेब, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड साहेब तसेच शिक्षणाधिकारी पाटील साहेब यांनी प्रवीणजी शिंदे सर यांचे विशेष अभिनंदन केले. प्रवीणजी शिंदे सर यांच्या या यशामुळे थोरला मळा शाळा, करंजी केंद्र तसेच पाथर्डी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सहकारी शिक्षक, पालकवर्ग, विद्यार्थी आणि ग्रामस्थांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील राज्यस्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनासाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. निश्चितच, प्रवीणजी शिंदे सर यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून शिक्षणाला प्रयोगशीलतेची दिशा देणारे आणि नव्या पिढीला वैज्ञानिक दृष्टिकोनाने घडवणारे प्रेरणास्थान ठरणारे आहे.



# अशोक उद्योग समूह व शिवसेनेकडून पत्रकारांचा सन्मान

**श्रीरामपूर । रयत समाचार**

अशोक उद्योग समूह व शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधत शहरातील रयत समाचारचे प्रतिनिधी हाजी शफीक बागवान यांच्यासह अनेक पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. श्रीरामपूर तालुक्याचे माजी ज्येष्ठ आमदार, अशोक कारखान्याचे चेअरमन व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ज्येष्ठ संचालक भानुदास मुरकुटे यांच्या हस्ते, तसेच माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी श्रीरामपूर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मंजुश्री मुरकुटे व अशोक कारखान्याचे तरुण संचालक नीरज मुरकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या श्रीरामपूर टाऊन शाखेतील स्व. भास्करराव गलांडे पाटील सभागृहात आयोजित या कार्यक्रमात पत्रकारांना बॅग, टॉवेल, पेन व डायरी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शहरातील अनेक पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व आभार नीरज मुरकुटे व भाऊसाहेब काळे यांनी मानले.



# शैक्षणिक गुणवत्ता टिकवण्यासाठी शिस्त, परिश्रम व जिज्ञासा महत्त्वाची- अ‍ॅड. शिरसाठ

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा येथील नागवडे विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासासाठी अ‍ॅड. गणेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड. प्रसाद इंगळे होते. या प्रसंगी अ‍ॅड. शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासपद्धती, संशोधनाची गोडी, उच्च शिक्षणाच्या संधी तसेच करिअरविषयक मार्गदर्शन केले. नियमित अभ्यासासोबत संदर्भग्रंथांचे वाचन, लेखनकौशल्य आणि सखोल विचार करण्याची सवय लावण्याचे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठीन शिक्षणात गुणवत्ता टिकवण्यासाठी शिस्त, परिश्रम व जिज्ञासा महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विविध शैक्षणिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असेही मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे पुढील शैक्षणिक वाटचालीस दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलांडे, सोनिया गांधी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. नरेंद्र भोस, श्रीगोंदा वकील संघाचे सदस्य अ‍ॅड. अशोक रोडे, अ‍ॅड. सुनील भोस, अ‍ॅड. अशोक वाळुंज, अ‍ॅड. जयंत शिंदे, अ‍ॅड. रोहित गायकवाड, अ‍ॅड. अक्षय मखरे, अ‍ॅड. सचिन कोरडकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. गितेश सुरसे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. जी. बी. नेवसे, अ‍ॅड. नितीन भिंगारदिवे, अ‍ॅड. संतोष दांगडे, प्रा. साक्षी तसेच वुमन कल्चरल रिप्रेझेंटेटिव्ह पूजा बेंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ. अंजुला चौबे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार अ‍ॅड. अक्षय फाटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पतसंस्था फेडरेशनकडून सहकार चर्चासत्र

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने बदलते सहकार धोरण व सहकार कायद्यात अपेक्षित बदल या विषयावर मंगळवार, ता. १३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता शहरातील अपूर्वा हॉल येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीरामपूर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक वासुदेव काळे हे भूषविणार आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष व राज्य सहकार धोरण समितीचे सदस्य काकासाहेब कोयटे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. ही माहिती फ ेडरेशनचे उपाध्यक्ष अनिरुद्ध महाले यांनी दिली.

याप्रसंगी राज्य सरकारने गठित केलेल्या सहकार धोरण समितीवर निवड झाल्याबद्दल काकासाहेब कोयटे यांचा तालुका पतसंस्था फेडरेशनच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. या चर्चासत्रास तालुक्यातील सर्व पतसंस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक व व्यवस्थापक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष भाऊसाहेब मुळे यांनी केले आहे.

# शनिशिंगणापूर-वांबोरी रेल्वे मार्गाला हिरवा कंदील

**नेवासा । विजय खंडागळे**

शनिशिंगणापूर ते वांबोरी या २१.८४ किलोमीटर लांबीच्या नवीन लोहमार्गासाठी अधिसूचना जारी होताच या रेल्वे मार्गाचे शनिशिंगणापूर परिसरात स्वागत करण्यात येत असून आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या मार्गावर काही ठिकाणी जमीन संपादनासंदर्भात शेतकऱ्यांकडून विरोध होताना दिसत असला, तरी भविष्यातील विकासाच्या दृष्टीने शासनाने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे. कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रेल्वे मार्गामुळे राज्यातील धार्मिक स्थळांवर येणाऱ्या भाविकांना स्वस्त, सुरक्षित व सोयीचा प्रवास उपलब्ध होणार असून देवदर्शन सुलभ होणार आहे. त्यामुळे केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने शनिशिंगणापूरवांबोरी रेल्वे मार्गासाठी हालचालींना वेग दिला आहे. नुकत्याच नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमणाचा विषय ऐरणीवर आला असून, या बाबीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. भविष्यात शनिशिंगणापूरकडे येणारे रस्ते अरुंद व अपुरे ठरण्याची शक्यता असून, जलद व सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने शिंगणापूरवांबोरी हा नवीन रेल्वे मार्ग आवश्यक असल्याचे मत मुळा कारखान्याचे संचालक व शनेश्वर देवस्थानचे माजी विश्वस्त बाप्पुसाहेब शेटे यांनी व्यक्त केले. हा निर्णय पर्यटन व धार्मिक सर्किट एकमेकांना जोडणारा असल्याचे त्यांनी सांगितले. रेल्वे मार्ग शिंगणापूरराहुरी रोडवरील उंबरे परिसरातून आल्यास केंद्रीय रेल्वेचा खर्च कमी होईल, अंतरही कमी पडेल व भाविकांना कमी वेळेत दर्शन मिळेल. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतील तसेच जमीन संपादनही मर्यादित राहील, अशी प्रतिक्रिया शनेश्वर देवस्थानचे माजी अध्यक्ष भागवत बानकर यांनी दिली. या रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण २०२३ मध्ये झाले असून अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. सुमारे ४ हजार कोटी रुपयांचा डीपीआर असलेल्या या मार्गामुळे छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, कोल्हापूर, पुणे व नाशिक या भागातून येणाऱ्या शनीभक्तांना सुलभ प्रवास मिळणार असल्याचे शनिशिंगणापूरचे सरपंच बाळासाहेब बानकर यांनी सांगितले. कित्येक पिढ्यांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आता मार्गी लागत असून, जमीन संपादनाबाबत शासनाकडून योग्य मोबदला मिळणार आहे. या प्रकल्पाला विरोध करणे म्हणजे पुढील पिढीचे नुकसान करण्यासारखे ठरेल, अशी प्रतिक्रिया शनीभक्त गोरक्षनाथ साळुंके (कांगोणी) यांनी व्यक्त केली.



# छत्रपती शिवाजी विद्यालयात बाल आनंद मेळावा उत्साहात

**पाथर्डी । रयत समाचार**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, कासार पिंपळगाव येथे बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा समिती सदस्य मुरली भगत यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलासराव भगत तसेच माजी विद्यार्थी नवनाथ तिजोरे व गणेश भगत यांच्या उपस्थितीत झाले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी नवनाथ तिजोरे यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत माजी विद्यार्थी म्हणून आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोसावी यांनी बाल आनंद मेळावा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा असून, तो त्यांच्या भविष्यकाळातील व्यावहारिकतेसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असे मत व्यक्त केले. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉलद्वारे फळभाज्या, पाणीपुरी, वडापाव, भेळ, केक आदी पदार्थ विक्रीस ठेवले होते. या मेळाव्यास विद्यार्थी व बहुसंख्य पालक वर्गाने भेट देत विद्यार्थ्यांकडून पदार्थांची खरेदी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी लवांडे यांनी तर प्रास्ताविक विजय भताने यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी शिक्षक भागवत आव्हाड, विनोद सरोदे, किशोर बानकर, राजेंद्र वांढेकर, सचिन पवार, अभयसिंह चितळे, भाऊसाहेब गायकवाड, प्रशांत अकोलकर, औसेकर भाऊसाहेब, संजय शिंदे, संजय आठरे तसेच श्रीमती गोबरे, दुशिंग, भांगरे, शेख, लवांडे, वाघमोडे व बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होता.

# जिल्हास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात अगस्तीची सर्वोत्तम कामगिरी

## आर्या गुजर हिचा 'सेफ राईड-२.०' प्रकल्प जिल्ह्यात प्रथम

**अकोले । सतीश पाचपुते**

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले येथील विद्यार्थ्यांनी नुकत्याच जामखेड येथे झालेल्या जिल्हास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता ९ वी ते १२ वी विज्ञान गटात कु. आर्या विजय गुजर हिने सादर केलेल्या 'सेफ राईड-२.०' या प्रकल्पास जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळाला असून नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी तिची निवड झाली आहे.



या यशानिमित्त संस्थेच्या वतीने सेक्रेटरी शैलजा पोखरकर, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी व सतीश नाईकवाडी यांच्या शुभहस्ते कु. आर्या गुजर तसेच सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कृष्णा प्रविण आरोटे यांचा सन्मान करण्यात आला. तालुकास्तरीय प्रदर्शनातही आर्या गुजर हिने प्रथम क्रमांक पटकावला होता. 'सेफ राईड-२.०' या प्रकल्पामध्ये स्मार्ट हेल्मेटद्वारे अल्कोहोल डिटेक्शन सेन्सर, ब्लूटूथ तंत्रज्ञानाचा वापर करून मद्यपान केले असल्यास वाहन सुरू न होणे तसेच हेल्मेट घातल्याशिवाय इंजिन सुरू न होणे अशी वैशिष्ट्ये असून, वाढते रस्ते अपघात व ड्रिंक अँड ड्राइव्ह रोखण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरू शकतो, असे मत परीक्षकांनी नोंदवले.

दरम्यान, संस्थेच्या सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्राम्हणवाडा येथील कृष्णा प्रविण आरोटे याने सादर केलेल्या 'मातीविना शेती' (हायड्रोपोनिक फार्मिंग) या प्रकल्पास आदिवासी विभागातून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळून राज्यस्तरासाठी निवड झाली आहे. या यशामुळे संस्थेच्या दोन्ही विद्यालयांनी जिल्हास्तरावर चमकदार कामगिरी नोंदवली आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती, पालक वर्ग तसेच मार्गदर्शक शिक्षक नीरज वाळुंज, महेश देशमुख व अलीम तांबोळी यांच्याकडून आर्या गुजर व कृष्णा आरोटे यांचे अभिनंदन होत आहे.

# आजची युवा पिढी

जगातील सर्वात तरुण देश जर कोणता असेल तर तो आपला भारत देश आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४४ कोटी इतकी आहे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. देशाचे भविष्य याच तरुणांवर अवलंबून आहे. याच तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणच आपल्या देशाचे भाग्यविधाते आहेत असे ते म्हणत. या तरुणांकडे असलेल्या ऊर्जेचा उपयोग देशकार्यासाठी करुन घ्यावा असे त्यांचे मत होते. पण आज तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे ते बेरोजगारीचे. आजचे तरुण उच्चविद्याविभूषित आहेत. हुशार आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात आजचे तरुण अग्रेसर आहेत. देशासाठी काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द त्यांच्याकडे आहे. शिक्षण आणि काम करण्याची उर्मी असूनही त्यांच्या हाताला रोजगार नाही. पदव्यांचे भेंडोळे घेऊन तरुण जागोजागी फिरत आहेत मात्र त्यांना नोकरी मिळत नाही. सरकारी नोकर भरती बंद आहे. खाजगी क्षेत्रात नोकरी मिळत नाही. ज्यांना आहे त्यांना नोकरी टिकवणे मुश्किल झाले आहे. स्वतःचा व्यवसाय, उद्योग करायचा म्हटले तर भांडवल नाही. शेतीही बेभरवशाची झाली आहे त्यामुळे आजचे तरुण हताश झाले आहेत. या हताश तरुणांना धीर देऊन त्यांना रोजगार देण्याऐवजी राजकीय नेते त्यांना पकोडे विका असे म्हणून त्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. रोजगार नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड निराशा पसरली आहे. नैराश्यातून काही तरुणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी गेले आहेत. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण रोजगार नसल्याने आपले जीवन अकाली संपवत आहे तर काही तरुण व्यसनांच्या आहारी जात आहेत हे पाहून मन खिन्न होते. रोजगार मिळत नसल्याने तरुणांच्या मनात व्यवस्थेविरुद्ध सुप्त असंतोष आहे. या असंतोषाचा भडका होण्याआधीच सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस धोरण आखावे. जर या तरुणांच्या मनातील असंतोषाचा भडका झाला तर भल्याभल्यांना पळता भुई थोडी होईल. सध्याच्या बेरोजगारीचा दर हा मागील ४५ वर्षातील सर्वात जास्त आहे ही बाब आपल्या देशाला भूषणावह नाही. हा दर कमी करण्यासाठी आणि तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार काही ठोस प्रयत्नही करताना दिसत नाही. या तरुणाईचा वापर केवळ मते मिळवण्यासाठीच केला जात आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. तरुणांच्या हाताला काम मिळणे ही काळाची गरज आहे कारण तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही तर तरुणाई भरकटण्याची शक्यता अधिक आहे. त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्यातील ऊर्जेचा समाजाला, देशाला उपयोग होण्याऐवजी ती ऊर्जा वाया जाण्याचीच शक्यता अधिक आहे. या तरुणांच्या शिक्षणाचा व ऊर्जेचा देशकार्यासाठी उपयोग व्हायला हवा. त्यांचा उपयोग जर देशकार्यासाठी झाला तर आपल्याला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आजची तरुणाई हीच आपली शक्ती आहे. या शक्तीचा वापर व्हायला हवा. जगात सर्वात जास्त तरुण भारतात आहे. जगात चिननंतर सर्वात जास्त लोकसंख्या भारतात आहे. खरंतर याला समस्या न मानता संधी मानली पाहिजे. या संधीचे सोने करुन तरुणांच्या हाताला रोजगार दिल्यास भारत महासत्ता बनेल यात शंका नाही. आजच्या तरुणांना जग सुंदर शांत असावे असे वाटते. गरिबी, भ्रष्टाचार त्यांना नको आहे. प्रजासत्ताक राष्ट्रावर त्यांची निष्ठा आहे. आपण समोरच्याला समजून न घेता त्याचा दुस्वास कसा करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यांना एक स्थिर व सुरक्षित अर्थव्यवस्था हवी आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसराबाबत ते तितकेच जागृत असतात.संपत्ती कधीतरी संपून जाईल त्यामुळे तिचा जपून वापर करण्यास ते प्राधान्य देतात. थोडक्यात सांगायचे तर आजचा तरुण जबाबदार आहे. तो आपल्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत आहे. याचवेळी पैशापेक्षा आनंद महत्वाचा असल्यामुळे तो आपल्या आवडीनुसार करियर निवडण्यास प्राधान्य देतोय त्यामुळे आपण जे काही काम करीत आहे त्यासाठी लोकांनी आपल्याकडे मानाने पहावे अशी त्यांची इच्छा आहे. आपल्या देशातील ६९ टक्के तरुणांना ठाम विश्वास आहे की पैसे त्यांच्यासाठी आनंद विकत आणू शकत नाही तर ८० टक्के तरुणांना पैशापेक्षा कला, ७९ टक्के तरुणांना पैशापेक्षा शिक्षण आणि ७६ टक्के तरुणांना पैशापेक्षा यश महत्वाचे वाटते.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# जवाहर विद्यालयात उच्च माध्यमिक माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

**नेवासा । प्रा. रावसाहेब राशिनकर**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा (ता. नेवासा) येथे विद्यालयाच्या स्थापनेपासून १९५९ ते २०२५ या कालावधीतील सर्व माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात विविध वयोगटातील माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी व एस. पी. कॉलेज, पुणे येथील उपप्राचार्य सोपानराव शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी संस्था कार्यकारिणी सदस्य नानासाहेब अंबाडे, डॉ. दीपक शिंदे, संभाजीराजे दहातोंडे, विनोद गुंदेचा, अमृत गांधी, प्रा. किसन अंबाडे, आसाराम कर्डिले, मच्छिंद्र थिटे, आर. डी. गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास दहातोंडे, उपाध्यक्ष किरण जावळे, सरपंच रावसाहेब दहातोंडे, माजी सरपंच सुनंदा दहातोंडे, ज्योती जावळे, प्राचार्य अंशुमन वाकचौरे, उपप्राचार्य रघुनाथ





भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, संतोष कानडे, देविदास दहातोंडे, सोसायटी चेअरमन अरुणभाऊ दहातोंडे, प्रा. प्रकाश दातार, डॉ. विकास दहातोंडे, देविदास पासलकर, पत्रकार देविदास चौरे, अरुण सोनकर तसेच शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, वैद्यकीय, व्यापारी व कृषी क्षेत्रात कार्यरत चांदा पंचक्रोशीतील माजी विद्यार्थी व पदाधिकारी उपस्थित होते. स्नेहमेळाव्यात संभाजी दहातोंडे , नानासाहेब अंबाडे, डॉ. दीपक शिंदे, प्रा. अशोक चौधरी, प्रा. किसन अंबाडे, प्रा. रावसाहेब राशिनकर, किशोर रक्ताटे, संतोष कानडे, किशोर शिंदे, कार्तिक पासलकर, ज्योती जावळे, जनार्धन पटारे व विनोद गुंदेचा यांनी मनोगत व्यक्त करत शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. यावेळी विद्यालयाच्या प्रगतीसाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मदत उभारणीसाठी माजी विद्यार्थी महासंघाची स्थापना करण्यात आली. शिक्षणप्रेमी ज्येष्ठ नागरिक व माजी विद्यार्थी डॉ. विनोद गुंदेचा यांची अध्यक्षपदी तर प्राचार्य अंशुमन वाकचौरे यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक संदीप शेंडगे यांनी केले. सूत्रसंचालन उच्च माध्यमिक समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे व सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती स्वाती दळवी यांनी केले, तर आभार ज्येष्ठ शिक्षक संजय ढेरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रा. भगवान बारस्कर यांना पीएचडी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**



आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रा. भगवान प्रभाकर बारस्कर यांनी शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी संपादन करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत मोलाची भर घातली आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून ही पदवी यशस्वीरीत्या प्राप्त केली. शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण व समकालीन विषयावर सखोल संशोधन करत प्रा. बारस्कर यांनी विद्यापीठाच्या सर्व निकषांची पूर्तता करणारा दर्जेदार संशोधन प्रबंध सादर केला. त्यांच्या या संशोधनामुळे शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता व संशोधन प्रक्रियांना नवी दिशा मिळणार असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे प्रमुख ॲड. डॉ. शिवाजीराव काकडे, नवमहाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे तसेच उच्च शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. हेमंत गांगुर्डे यांनी प्रा. बारस्कर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने प्रा. बारस्कर यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमशील वृत्तीचे, अभ्यासू दृष्टीकोनाचे व शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रा. भगवान प्रभाकर बारस्कर यांचे हे शैक्षणिक यश भविष्यात शिक्षक प्रशिक्षण, संशोधन व उच्च शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीस निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



# आमचे खुपसे साहेब परत द्या; बीएलओंची मागणी

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

निवडणूक शाखेतील महसूल सहाय्यक ओम रामजी खुपसे यांची बदली शनी शिंगणापूर येथे झाल्याने श्रीरामपूरमधील बी.एल.ओ. वर्तुळात तीव्र नाराजी पसरली आहे. या बदलीमुळे निवडणूक कामाचा बोजवारा उडण्याची भीती व्यक्त करत बी.एल.ओ. समन्वय समितीने शुक्रवार, ता. ०९ जानेवारी रोजी मिलिंदकुमार वाघ यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत साकडे घातले.

यावेळी अनेक बी.एल.ओ. उपस्थित होते. सध्या मतदार यादी पडताळणी, 'एस.आय. आर.' तसेच तांत्रिक स्वरूपाची क्लिष्ट कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या सर्व कामांत खुपसे यांनी आजवर गुंतागुंतीच्या प्रक्रियांचे सोप्या पद्धतीने मार्गदर्शन करून बी.एल.ओंना मोलाची मदत केली आहे. ''काळजी करू नका, आपण मार्ग काढू'' असा धीर देणारा अधिकारी गेल्याने संपूर्ण व्यवस्थेचे गणित बिघडू शकते, अशी भावना बी.एल.ओ. बांधवांनी व्यक्त केली.

> **खुपसे साहेबांच्या बदलीची बातमी ऐकून सर्व बी.एल.ओ. बांधवांमध्ये अस्वस्थता आहे. त्यांनी नेहमीच पारदर्शक व मैत्रीपूर्ण वातावरणात काम करून घेतले. आगामी आव्हाने पाहता त्यांची आम्हाला नितांत गरज आहे.**
> **प्रदीप दळवी,** बी.एल.ओ., शिरसगाव

विधानपरिषद, लोकसभा, विधानसभा तसेच नगरपरिषद निवडणुकांतील त्यांचे चोख नियोजन पाहता प्रशासकीय हितासाठी ही बदली तातडीने रद्द करून त्यांची पुनर्नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी २२०श्रीरामपूर (अ.जा.) मतदारसंघातील बी.एल.ओंनी केली आहे. आता जिल्हाधिकारी या लोकभावनेची दखल घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सामाजिक हित साधण्याचे काम पत्रकार करतात- वाघचौरे

# मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार दिन साजरा

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

प्रशासनामध्ये काम करत असताना कायदा व सुव्यवस्था राखण्यात पत्रकारांचे मोलाचे सहकार्य मिळते. वस्तुस्थिती पत्रकारांना स्पष्टपणे सांगितल्यामुळे प्रशासनालाही अनेक महत्त्वाची माहिती मिळते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसुधारणा घडते तसेच लोकांपर्यंत योग्य माहिती पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करतात, असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले. श्रीरामपूर मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, ॲड. बाळासाहेब देशमुख, ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी, पद्माकर शिंपी, रमण मुथा, बाळासाहेब



भांड, पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर, महेश रक्ताटे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी समाजात पत्रकारांची मोठी भूमिका असून लोकशाहीचे प्रतीक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार करतात, असे सांगून पुरस्कारार्थींना शुभेच्छा दिल्या. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी पत्रकार हे प्रशासनाचे कान, नाक व डोळे असून सर्व पत्रकारांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी श्रीरामपूर मराठी पत्रकार संघातर्फे ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा, रमेश कोठारी, पद्माकर शिंपी, विवेक लोहकणे व जयेश सावंत यांना आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रकाश कुलथे व नितीन चित्ते यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार मारुतराव राशिनकर, पद्माकर शिंपी सर, देविदास देसाई, नागेशभाई सावंत व रमण मुथा यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकारांसाठी संपादक करण नवले यांचे व्याख्यान झाले. त्यांनी आधुनिक काळाची गरज ओळखून पत्रकारांनी आपले ज्ञान अद्यावत ठेवावे व स्पष्टपणा राखावा, असे सांगितले. उपस्थित पत्रकारांना प्रसाद क्राकरीचे देविदास चव्हाण, राजपालचे अरुण कतारे, करण नवले, पद्माकर शिंपी व जयेश सावंत यांच्यावतीने भेटवस्तू देण्यात आल्या. मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर पाटील यांनी प्रास्ताविकात संघाच्या कार्याची माहिती देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण जमधाडे व संतोष मते यांनी केले, तर आभार संघाचे उपाध्यक्ष सलीमखान पठाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश रक्ताटे, उपाध्यक्ष सलीमखान पठाण, सचिव सचिन उघडे, नितीन चित्ते, अमोल कदम, दीपक कदम, मयूर पांडे, मधुकर माळवे, स्वप्निल सोनार, असलम बिनसाद, गौरव शेटे, सागर दोंदे, सुहास बेटकर तसेच लोकमान्य टिळक वाचनालयाच्या ग्रंथपाल स्वाती पुरे व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास डॉ. रवींद्र कुटे, ॲड. बाबा शेख, अरुण पाटील, विष्णू वाघ, महेश माळवे, शिवाजी पवार, अनिल पांडे, रवी भागवत, राजेंद्र बोरसे, गौरव साळुंके, आप्पासाहेब आदिक, अभिजीत कुलकर्णी, लालमोहम्मद जहागीरदार, सुरेश कांगुणे आदींसह शहर व ग्रामीण भागातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



# कानगाव शाळेत भरला 'आनंदी बाजार'

## चिमूकल्यांच्या उपक्रमात ३० हजारांची उलाढाल

**दौंड । रयत समाचार**

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कानगाव ही शाळा उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री तसेच व्यवहारज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने शनिवार, १० जानेवारी रोजी आनंदी बाजार व खाऊ गल्ली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आनंदी बाजार उपक्रमात विद्यार्थ्यांनी आठवडी बाजार भरवला होता. या बाजारात पालेभाज्या, फळभाज्या, फळे, गुळाची ढेप, बिस्किटे, घरगुती शोभिवंत वस्तू, संक्रांतीचे वाण तसेच विविध प्रकारच्या स्टेशनरीचे स्टॉल लावण्यात आले होते. तसेच खाऊ गल्लीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. या आनंदी बाजाराला ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली, तर खाऊ गल्लीला भेट देत विद्यार्थ्यांनी बनवलेल्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. या उपक्रमात सुमारे ३० हजार रुपयांची उलाढाल झाली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. आनंदी बाजाराचे उद्घाटन कानगावचे माजी सरपंच डॉ. संपत फडके व हनुमंत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब गवळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण कोऱ्हाळे, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर शेळके, शंकर काळे, योगेश चौधरी, ॲड. पोपट गवळी, नानासाहेब कोऱ्हाळे, निलेश गवळी, मनोहर गवळी, ज्ञानेश्वर हरगुडे, माजी मुख्याध्यापक शामराव जगताप, सुधीर नराळे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक संजय गवळी यांच्यासह शिक्षक राजेंद्र जगताप, सखाराम खोमणे, श्याम ठाणेदार, एकनाथ हराळ, प्रकाश लकडे, मीना दिवेकर व संध्या कुंभार यांनी केले होते.